Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

36. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे महिला सबलीकरणातील योगदान / प्रा. [illegible] |106
37. कामशास्त्र आणि नाट्यशास्त्रातील नायिका / प्रा. डॉ. अरविंद [illegible] |108
38. स्वामी रामानंद तीर्थ यांचे नांदेड जिल्ह्यातील शैक्षणिक कार्य / प्रा.डॉ. [illegible] सिताराम [illegible] |111
39. मराठवाड्यातील स्त्रीयाची आर्थिक परिस्थिती / प्रा.डॉ.सुरेश कातले |114
40. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात पत्नी रमाबाईचे योगदान / प्रा.डॉ.विश्वासपार [illegible] |117
41. राजकारणातील नामवंत स्त्रियांचा इतिहास / डॉ. शारदा बंडे |120
42. राजकीय क्षेत्रातील महिलांचा सहभाग / प्रा.डॉ.नागरगोजे एस.एल |123
43. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेस्त्री विषयक विचार / डॉ.शेप बाबासाहेब केशवराव &डॉ. विनोद जगतकर |125
44. हैद्राबाद मुक्ति लढयातील महिलांचा सहभाग / प्रा.चाटे नारायण संभाजीराव & प्रा.गायकवाड राहुल मारोतीराव |128
45. स्वातंत्र्य लढयातील महीलांचा सहभाग / प्रा. गंगणे ए.यु. |130
46. महात्मा ज्योतीबा फुल्यांचे महिला सबलीकरणातील योगदान / प्रा.डॉ.बिराजदार डि.एस |133
47. हैद्राबाद मूक्ती लढयातील महिलांचा सहभाग / प्रा. राजेसाहब गंगाधर भोसले |136
48. राजकीय क्षेत्रातील महिलांचा सहभाग: विशेष संदर्भ अमरावती जिल्हा एक ऐतिहासिक विश्लेषण / प्रा.डॉ. नितीन उल्हासराव सराफ |138
49. हैद्राबाद मुक्तीसंग्रामात महिलांचे योगदान / डॉ.प्रभाकर भिरकड |140
50. महिलासक्षमीकरण आव्हाने आणि उपाययोजना / प्रा.डॉ. वाघमारे विष्णु बब्रुवान |143
51. मादाम कामा यांचेभारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान / प्रा.डॉ. भागुसे कारभारी लक्ष्मण |146
52. शिवकालीन महापुरूषांच्या कार्यात महिलांचा सहभाग / प्रा. डॉ. पवार रामचंद्र पांडूरंग |149
53. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार / प्रा. कदम एम.एम. |152
54. बंजारा समाजातीलस्त्री जीवन / डॉ.राठोड उत्तम छाजू |154
55. पेशवेकालीन कर्तबगार स्त्रीयांचे राजकारणातील योगदान / गंगणे आर.व्ही. |157
56. भारतीय इतिहासात महिलांचे स्थानः ऐतिहासिक अवलोकन / डॉ.अनंत नामदेवराव शिंदे |161
57. क्रांतीज्योती सावित्रीबाईचे कार्य आणि कर्तृत्व : एक अभ्यास / सहा.प्रा. कांतराव किसनराव कल्याणे |164
58. स्वा.सावकरांच्या साहित्यातून प्रकटणारास्त्री-विषयक दृष्टीकोन / प्रा.शेकडे मोनिका बंडुराव |168
59. भारतीय क्रांतीकारी चळवळीतील स्त्रियांचे योगदान / डॉ. गिरीधर नागोराव सोमवंशी |171
60. हैद्राबाद मुक्ती लढ्यातील महिलांचा सहभाग / प्रा.डॉ.बोचरे जे.एम. / श्री पल्लेवार के.डी. |174
61. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सबलीकरण / डॉ.प्रा. बनसोडे एम.डब्ल्यु. |177
62. महिला सबलीकरणाच्या दृष्टीने शैक्षणिक धोरणांचा ऐतिहासिक आढावा / डॉ. अमित एकनाथराव गावंडे |179
63. स्त्रीवाद व स्त्रीमुक्ती चळवळ : एक अभ्यास / प्रा. डी. झेड. सावळे |182
64. हैद्राबाद मुक्ती लढयातील महिलांचा सहभाग / प्रा.शिंदेहरिदास अर्जुन |184
65. स्त्रीयांच्या शौर्याचे प्रतिक-झलकारी बाई / प्रा.डॉ.सुशीलकुमार शंकरराव सरवदे |186
66. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचा सहभाग / प्रा.डॉ.दामाजीवाले एम.डी. |188
67. मोगलकालीन स्त्रियांची सामाजिकस्थिती : एक अभ्यास / प्रा.डॉ. शहाजहान शेख |192
68. पंतप्रधान इंदिरा गांधींची अंतर्गत कामगीरी / प्रा.किशन गिराशे |195

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

52.

# शिवकालीन महापुरूषांच्या कार्यात महिलांचा सहभाग

प्रा. डॉ. पवार रामचंद्र पांडूरंग
इतिहास विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा
ता.जि.बीड मो. नं. ९४२२६४११२६

## प्रस्तावना :

भारताला किर्ती व वैभव प्राप्त करून देणाऱ्या महापुरूषांचे चरित्र सर्वांना माहिती आहे. पण त्यांच्या स्त्रियांचे चरित्र व कार्य याची माहिती मात्र फारशी उपलब्ध नाही. प्राचीन काळात भारतातील स्त्रीयांचे स्थान महत्वपूर्ण होते. पितृसत्ताक कुटूंब पध्दतीत स्त्रीयांचा सन्मान केला जात असे. ऋग्वेद काळात धार्मिक कार्यात स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान होते. तिला गृहस्वामिनी म्हणून ओळखले जाई. मात्र उत्तरवैदिक काळात स्त्रीयांच्या स्थितीत घसरण झालेली दिसते. या काळात स्त्री-पुरूषांच्या तुलनेत दुय्यम मानले जाऊ लागली. असे असले तरी शतपत ब्राम्हण ग्रंथात पुरूषाला पूर्णत्व प्राप्त पत्नीमुळे होते. ब्राम्हण काळात शिक्षण हे गुरूगृही जाऊन घ्यावे लागत असे किंवा आश्रमात घ्यावे लागे. त्यामुळे मुलींना आश्रमात पाठवणे जिकरीचे होऊ लागले आणि स्त्रियांचे कार्य 'चूल व मूल' एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले.

मध्ययुगीन काळात स्त्रीला सर्व प्रकारचे सामाजिक, आर्थिक व कायदेशीर अधिकार नाकारण्यात आलेले होते. हिंदू शास्त्रकारांनी शेती व उद्योगधंद्यासाठी स्त्रीयांची शिफारस केलेली आहे. एवढी बंधने असतानाही काही राजघराण्यातील स्त्रीयांनी पुरूषाप्रमाणे उत्कृष्ठ शरीर कमवून नियमित व्यायाम करून वेगवेगळ्या कलेत नैपुण्य प्राप्त करीत असत असा उल्लेख थॉमस बोटॉन यांच्या पुस्तकात आढळतो. स्त्री स्वतः एक शक्तीचे रूप आहे. आपल्या अंतरातील प्रेमरूपी शक्ती व सद्‌गुणाच्या साहाय्याने ते असाध्य ते साध्य करून दाखवू शकते. पण सत्य स्थिती अशी आहे की, फारच थोड्या स्त्रीयांना स्वतः मधील शक्तीची जाणिव होते. स्त्रीयामध्ये पराकोटीची सहनशिलता, निरंतर कार्यक्षमता, प्रेमभाव, सहनशिलता व समायोजन अशा अनेक गुणांचा संगम आढळतो. स्त्री-पुरूष यांनी स्वतः मधील बलस्थाने ओळखून परस्परांना पूरक ठरतील असे कार्य केले तर स्त्री-पुरूष हे दोघेही मिळून एक निकोप संस्कारक्षम समाजाची निर्मिती करू शकतील. स्त्रीला अनेक रूपे धारण करावी लागतात. ती कोणाची पत्नी असते तर त्याचवेळी ती कोणाची माता किंवा आई. आईच्या मायेची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. म्हणून म्हटले जाते 'तिन्ही जगाचा स्वामी आई विना भिकारी' यातच स्त्री जातीची महती कळून येते. आई नावाच्या शब्दात 'देवालाही नवलाई', विठ्ठलही पंढरीचा म्हणे स्वतःला विठाई' अशी स्तुती संतांनी केली आहे. आजचे २१ वे शतक महिलांचे आहे असे म्हटले जाते. स्त्रियांच्या सबलीकरणाचे व त्यांच्या सक्षमीकरणाचा गाजा-वाजा होत असला तरी स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी कायदे करावे लागतात हे दुर्दैव आहे. फक्त कायदे करून स्त्रीयांचे प्रश्न सुटणार नाहीत, तर समाजाची मानसिकता बदलण्याची खरी गरज आहे, ती बदलण्यासाठी थोर पुरूषांच्या जडण-घडणीतील महिलांच्या कर्तृत्वाचा आलेख पहावा लागेल.

प्रस्तुत शोध निबंध मध्ययुगीन कालखंडातील विशेषतः शिवकालीन काळातील महापुरूषांच्या जडण-घडणीतील महिलांचे योगदान या विषयाशी संबंधीत आहे. या शोधनिबंधात वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब केलेला आहे. या शोधनिबंधासाठी दुय्यम साधने वापरण्यात आलेली आहेत. मध्ययुगीन कालखंडाचे सर्वसाधारणपणे अभ्यासाच्या दृष्टीकोनातून तीन कालखंड पडतात. १) सुलतानशाहीचा कालखंड, २) मोगल कालखंड, ३) मराठा कालखंड, मराठा कालखंडाचेही शिवकाल इ.स.१६३० ते इ.स.१७०७ व पेशवेकाळ इ.स.१७०७ ते इ.स.१८१८.

विशेषतः शिवकाळातील महापुरूषांच्या जडण-घडणीत महिलांचे योगदान प्रामुख्याने या शोधनिबंधात घेतलेले आहे. शिवकालीन स्त्रियांचा दर्जा हा शिवपूर्व काळात जसा होता तसाच होता, त्यात फारसा बदल झालेला नव्हता. शिवकालीन स्त्रीजिवनाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे-

१) पुरूष प्रधान कुटुंब पध्दती अस्तित्वात होती.

२) स्त्रियांना समाजात गौण व दुय्यम स्थान होते.

३) मुलींचा जन्म कुटुंबात आनंदाचा मानला जात नव्हता.

४) बहुपत्नीत्वाचे प्रथा रूढ होते.

५) बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती.

वरील सर्व पार्श्वभूमीचा विचार केला तर मध्ययुगीन स्त्री अवनतीच्या काळातही काही महिलांनी महापुरूषांच्या जडण-घडणीत मोलाचे योगदान दिलेले दिसून येते. त्यात प्रामुख्याने राजमाता जिजाबाई, येशुबाई व महाराणी ताराबाई यांचा उल्लेख करावा लागेल.

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

**राजमाता जिजाबाई :**

प्राचीन यादव घराण्याच्या वारसा सांगणाऱ्या व निजामशाहीतील एक मातब्बर सरदार लखुजी जाधव आणि उमाबाई यांच्या पोटी इ.स.१५९५ मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड येथे जिजाबाईंचा जन्म झाला. वयाच्या केवळ १५ वर्षीच तोला-मोलाच्या भोसले घराण्यातील शहाजी राजाशी त्यांचा विवाह झाला. महाराष्ट्रातील दोन मान्यवर घरांनी विवाह सुत्रांनी बध्द झाली. परंतु खंडागळे हत्ती प्रकरणावरून ही दोन्ही घराणी ऐकामेकाच्या जिवावर बेतली. जिजाबाईला माहेर पारखे झाले. इ.स. १६२९ मध्ये लखूजी जाधवांचा निजामशाहीच्या भर दरबारात खूण झाला आणि जिजाबाईंचे पितृछत्र हरवले. या काळात पती शहाजीराजे कधी निजामशाहीत, कधी मोंगलाकडे तर कधी आदिलशाहीकडे चाकरी करतांना दिसतात. जाधव आणि भोसले या दोन्ही श्रेष्ठ घराण्याचे योग्य संस्कार या शालीन व कुलीन जिजाबाईच्या अंगी रूजले होते. या उच्च संस्कारयुक्त मुशीतून १९ फेब्रुवारी १६३० मध्ये शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. बालमानस शास्त्रज्ञाप्रमाणे शिवाजी महाराजावर योग्य संस्कार करून त्याला अन्यायी व अत्याचारी राजसत्तेविरूध्द उभा करण्याचे कार्य केले. शहाजी राजे व जिजाबाई या उभयतांच्या मनात जनतेचे स्वतंत्र राज्य स्थापन व्हावे असा मनोदय असल्यामुळे लहानपणी शिवाजी महाराजांना कशाप्रकारचे आदर्शाचे धडे देण्याला सुरूवात केली. जिजाबाईवर लहानपणी झालेले संस्कार तसेच लिहणे, वाचणे, घोड्यावर बसणे याचबरोबर रामायण, महाभारत, भागवत व हरिविजय या ग्रंथाचे अध्ययन केलेले असल्यामुळे त्याचा उपयोग जिजाबाईला शिवाजी महाराजांना घडविण्यासाठी झाला. तत्कालिन आदिलशाही, निजामशाही व मोगली सत्तेपासून होणारा रयतेवरील अन्याय व अत्याचार दूर करण्यासाठी शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा जिजाबाईंनी दिली. शिवाजी महाराजांची जिजामाता ही प्रेरणा व स्फुर्ती देवता होती. 'परस्त्री मातेसमान' असते हे पुस्तकात व स्टेजवरचे वाक्य बनत चाचले आहे. परंतु शिवाजी महाराजांनी ते कल्याणीच्या सुभेदाराच्या सुनेला दिलेल्या सन्मानातून खरे करून दाखविले. हाच आदर्श मातेच्या शिकवणुकीतून मिळाला होता. जिजाऊ सुरूवातीपासूनच अन्याय-अत्याचाराविरूध्द आवाज उठविण्याचे धडे शिवाजी महाराजांना दिले. जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी पुरंदरचा तह केला व त्यांना आग्रा येथे जावे लागले, तेव्हा जिजाबाईंनी स्वाराज्यांचा सुव्यवस्थीत कौशल्यपणे सांभाळला. शिवाजी महाराजांचेही आपल्या मातेवर सुयोग तीने घडवून आणला त्यामुळे महाराष्ट्राचा भाग्योदय झाला."

सेतू माधवराव पगडे यांच्या मते "आपल्या विख्यात पुत्रांच्या आयुष्यभर चाललेल्या संघर्षात जिजाबाई ही त्यास स्फुर्ती देणारी शक्ती ठरली. परस्परावर निष्ठा व माया असणाऱ्या माता-पुत्रांची अशी उदाहरणे इतिहासात क्वचितच आढळतील."

महादेव गोविंद रानडे यांनी Rise of the Maratha Power या ग्रंथात म्हटले आहे "जिजाबाई केवळ थोर कुळात उत्पन्न झाली व तिचा शरीरसंबंध थोर घराण्याशी होता. एवढ्यावर तिची थोरवी अवलंबून नव्हती. तिच्या थोरपणास तिच्या अंगचे गुणच कारणीभूत होते. शिवाजींचे जिजाबाईवर अतोनात प्रेम होते. प्रत्येक गोष्ट जिजाबाईंचा सल्ला घेतल्याशिवाय शिवाजी महाराज रहात नसत. जिजाबाईंनी पाळलेल्या बाळकडूनच कर्तृत्वाचीच पूर्ण ओळख कोणत्याही अवघड कामगीरीवर जायचे असेल तर शिवाजी प्रथम आईचा आशिर्वाद घेत असत. अशा थोर विभुती राजमातेचा मृत्यू १७ जून १६७४ मध्ये रायगडच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड या गावी झाला. माता जिजाऊ लौकिक अर्थाने आज जरी जिवंत नसल्या तरी त्यांनी दिलेले विचार आणि स्फूर्ती कायम राहील.

**महाराणी येसूबाई :**

महाराणी येसूबाईने अनेकांना राष्ट्रप्रेमाचे प्रेरणा देणारे व्यक्तीमत्व म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. छत्रपती संभाजी महाराज यांच्या पत्नी व दाभोळ प्रांतातील शृंगारपूरचे पिलाजी शिर्के यांची कन्या इ.स. १६६४-६५ मध्ये संभाजी व येसूबाईचा विवाह झाला. येसूबाईला संस्कारयुक्त जिजाबाईचा सहवास लाभला व तिच्याकडूनच गृहशिक्षणापासून ते राजकारणापर्यंतचे सर्व धडे मिळत गेले. येसूबाईने पतीच्या हयातीत व नंतरच्या काळात विविध प्रकारच्या खस्ता सहन केल्या, तुरूंगवास भोगला. तुरूंगातील संयमी व शांतीवृत्तीमुळे त्यांचा आदर्श व गुणाची महती सर्वांना झाली. छत्रपती संभाजी राजे लढाईवर असतांना येसूबाईना सोबत घेत असत. याचा फायदा येसूबाईंना पुढील काळात झाला. संभाजी राजांच्या सर्व सुख दु:खात सहभागी होऊन मदत करीत असे. म्हणून संभाजी राज्यांनी तिची योग्य पाहून सर्व अधिकार येसूबाईस दिले होते. राजमुद्राही येसूबाईच्या ताब्यात होती. येसूबाई प्रजाप्रेमी होत्या. त्यांच्या कार्यामुळे त्या आदरास पात्र बनल्या होत्या. चांगले विधायक कार्य करणाऱ्यास बक्षीसे देऊन सन्मान

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

खरी संभाजी राजांना जेव्हा मोगली सत्तेचे खरे स्वरूप समजले तेव्हा ते पुन्हा परत स्वराज्यात पन्हाळ गडावर येऊन दाखल झाले. महाराणी येसूबाईने इ.स.१६८२ मध्ये शाहू महाराजांना जन्म दिला व त्या मुलावर योग्य ते संस्कार करून संयमी व गुणी जनांची पारख करण्याची क्षमता शाहू महाराजात निर्माण केली. शाहू महाराजांच्या पुढील काळातील कार्यावरून ते दिसून येते. इ.स. १६८९ मध्ये संभाजी महाराज संगमेश्वर मुक्कामी असतांना त्यांना पकडून औरंगजेबाने प्रचंड छळ व क्रुरपणे शिरछेद करून त्यांचा वध केला. ही बातमी ऐकुण येसूबाईला किती दुःख झाले असेल याची कल्पनाही करता येणार नाही. अशाच वेळी पुत्रास गादीवर बसून तिने राज्यकारभार केला असता, पण मोगली संकटांना सामोरे जाण्यासाठी स्वराज्यांची गादी निःस्वार्थीपणे राजा रामास दिली. यातच तिचे मोठेपण दिसून येते. इ.स. १६८९ मध्ये झुल्फिकारखानाने रायगड जिंकल्यावर येसूबाई व शाहू यांना राजकैदी म्हणून औरंगजेबाच्या स्वाधिन केले. औरंजेबानेही त्यांना सन्मानाने वागविले. स्वराज्यात परत आल्यानंतर इ.स. १७३१ मध्ये येसूबाईचे निधन झाले. त्यांच्या निधनाने एका सद्गुणी व शाहू महाराजांना घडविणाऱ्या व्यक्तीमत्वास समाज मुकला गेला.

### महाराणी ताराबाई :

छत्रपती संभाजी राजे यांचा इ.स.१६८९ मध्ये वध झाल्यानंतर त्यांच्या वधाच्या सुडाने मराठे पेटवून उठले आणि मराठ्यांचा स्वतंत्र लढा चालू झाला. यात शिवाजी महाराजांची सून व राजारामाची पत्नी ताराबाई हिने पराक्रमाची बाजी लावून अखेर औरंगजेबाला पराभूत होऊन आपला देह येथेच ठेवावा लागला. यातच ताराबाईचे शौर्य दिसून येते. ताराबाईच्या अंगी शौर्य, धाडस, मुत्सद्दीपणा, राजकारण पटुत्व इत्यादी गुणांचा संगम झालेला होता. ती स्वतःच्या तंत्राने राज्यकारभार करणारी स्त्री होती. तिने अनेक मातब्बर सरदारांची मने स्वतःकडे वळवून त्यांना स्वराज्याच्या रक्षणासाठी सहभागी करून घेतले. छत्रपती शिवाजी महाराजांचे सेनापती हंबीरराव मोहिते यांची ती कन्या होती. तिचा विवाह राजा रामाबरोबर झाला. ताराबाईचे मुळ नाव सिताबाई होते. ताराबाई हंबीरराव मोहितेंच्या सानिध्यात वाढल्याने तिला सर्व क्षेत्रातील युध्दकलेचे ज्ञान अवगत झाले होते. 'ज्योतीने ज्योत पेटवावी' त्याप्रमाणे ताराबाईने विविध मराठा सरदारांना जे पत्रे लिहिली, ती पाहता त्या पत्राद्वारे तिने मराठा सरदारांच्या अंतःकरणात प्रतिकाराचा ज्वालामुखी प्रज्वलित केला व या धगधगत्या ज्वालेत औरंगजेबाची इतश्री झाली. मराठी शाही नष्ट करण्याचे औरंगजेबाचे स्वप्न ताराबाईच्या [illegible] तह करून त्यांच्या स्वाधीन करायचा व पुन्हा एक-एक किल्ला जिंकायचा ही ती युध्दनिती होती. पतीच्या निधनाने खचून न जाता ताराबाईने स्वराज्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेऊन स्वराज्य रक्षणाचे कार्य निकराने केले. औरंगजेबाच्या कैदेत असणाऱ्या संभाजी पूत्र शाहुचा मराठ्यांच्या राज्यावर हक्क नाही असे सातत्याने ताराबाईस वाटत असे. प्रखर बुध्दीमत्ता व श्रेष्ठ कार्यक्षमता असलेल्या ताराबाईच्या जीवनात सुख-दुःखाचे चढ-उतार अनेक आले. कर्तृत्वान स्त्री म्हणून तिचा लौकिक होता. स्वराज्यातील प्रमुख सरदार मंडळीत आपापसात मतभेद असतानाही ताराबाईंनी सर्वांचा उपयोग कुशलतेने स्वराज्य रक्षणासाठी करून घेतला. हे करीत असताना 'नाकापेक्षा मोती जड होऊ द्यायचा नाही' हे अंतर्गत राजकारणातील डावपेचात ताराबाई सरस होती. मराठ्यांचे राज्य अस्तित्वात ठेवणाऱ्या महाराणी ताराबाईचे निधन १० डिसेंबर १७६१ रोजी झाले. ताराबाईच्या कार्याविषयी डॉ. ब्रीज किशोर म्हणतात "औरंगजेब व ताराबाई यांच्यात सतत चाललेले युध्द हे देशाच्या इतिहासातील सर्वात रोमांचकारी प्रकरण म्हणून इतिहासात कायमचे नोंदविले जाईल."

भिमसेन सक्सेना ताराबाई विषयी म्हणतो की, "राजा रामाची बायको ताराबाई हीचा आपल्या नवऱ्यापेक्षाही अधिक दरारा होता. थोडक्यात वीर कन्या, वीर पत्नी व वीर माता म्हणून ताराबाईचे कार्य व कर्तृत्व फार मोठे होते. ताराबाईच्या स्वभावाला मर्यादा होत्या. तिचा स्वार्थ एवढाच होता की, महाराष्ट्राचे राज्य हे आपले व आपल्या मुलाचे आहे अशी तिची धारणा होती. ताराबाई ही एकतंत्री सत्ता गाजवणारी हुकूमशहाच होती. परंतु तिनेही सारी सत्ता स्वराज्याच्या कल्याणासाठी वापरली हे नाकारता येत नाही.

### संदर्भ ग्रंथसूची :

१. डॉ. एस.एस. गाठळ, *'भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन,'* कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
२. डॉ. धनंजय अचार्य, *'मध्ययुगीन भारत'* श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३. पद्मजा पाटील व शोभा जाधव *'भारतीय इतिहासातील स्त्रिया,'* फडके प्रकाशन कोल्हापूर, २००७.
४. डॉ. भिमराव आंबेडकर, हिंदू कोड बील.
५. शारदा देशमुख, *'शिवकालीन व पेशवेकालीन स्त्री जीवन,'* १९७३.
६. डॉ. कालुराम शर्मा व डॉ. प्रकाश व्यास, *'प्राचीन भारत का राजनैतिक एवं सांस्कृतिक इतिहास,'* पंचशील प्रकाशन, नागपूर.
७. प्रा. डॉ. एस.के. खांत, *'स्त्री शक्ती,'* अरहित पब्लिकेशन, पुणे.
८. लिला पाटील, *'भारतीय स्त्री जीवन,'* मेहता प्रकाशन, पुणे-